सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा-2018
दि. 19 जानेवारी, 2019

2019 पेपर-I

**Q12**

**A** → संच क्रमांक

**प्रश्नपुस्तिका**

**पेपर I**

**प्रश्नपुस्तिका क्रमांक**
**BOOKLET NO.**

# मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, शासकीय योजना व शासनाशी संबंधित बाबी

**वेळ : 1 (एक) तास**

**एकूण प्रश्न : 100**
**एकूण गुण : 100**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |

केंद्राची संकेताक्षरे ↑ ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पानावर पहा

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

1. मराठी शब्दसंग्रहातील फारसी व अरबी उपसर्ग नसलेला उपसर्ग ओळखा.
(1) ऐन (2) प्रति (3) बिन (4) कम

2. 'मूर्खपणाचा सल्ला देणारा' या शब्दसमूहासाठी खाली दिलेल्या पर्यायातून अचूक शब्द ओळखा व त्याचा योग्य पर्याय लिहा.
(1) उंटावरचा शहाणा (2) कळीचा नारद (3) अक्षरशत्रू (4) गुळाचा गणपती

3. अगोदर, पूर्वी, मागे, पुढे, उद्या, परवा – या शब्दयोगी अव्ययांचा प्रकार ओळखा.
(1) कालदर्शक (2) स्थलदर्शक (3) योग्यतावाचक (4) परिणामवाचक

4. खाली दिलेल्या वाक्यातून 'मिश्र वाक्य' ओळखा.
(1) पाऊस पडल्यावर अंगण ओलेचिंब झाले.
(2) जेव्हा पाऊस पडला तेव्हा अंगण ओलेचिंब झाले.
(3) पाऊस पडला आणि अंगण ओलेचिंब झाले.
(4) आलेल्या पावसाने अंगण ओलेचिंब झाले.

5. विशेषनाम म्हणजे :
(अ) व्यक्तिंना, वास्तूंना ठेवलेली नामे.
(ब) जी केवळ खुणेसारखी असतात.
(क) जी एकत्वसूचक असतात.
(ड) ज्यांना अनेकवचन शक्य नसते.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (अ), (ब) बरोबर
(2) (अ), (ब), (क), (ड) सर्व चूक
(3) फक्त (क), (ड) बरोबर
(4) (अ), (ब), (क), (ड) सर्व बरोबर

6. 'नालामुळे घोडा गमावणे' या म्हणीचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखा.
(1) चोरांमुळे धन गमावणे
(2) छोटीशी चूक दुरुस्त न केल्याने तिचा परिणाम वाईट होणे
(3) तणावामुळे कर्तत्वाचा वेग थांबणे
(4) दुसऱ्याच्या वर्तनामुळे आपले नुकसान होणे

7. विसर्गसंधी नसलेले उदाहरण ओळखून त्याचा अचूक पर्याय लिहा.
(1) पुरस्कार (2) वयस्कर (3) निष्कारण (4) नाहीसा

8. 'साहेब' हा शब्द मराठी भाषेत कोणत्या भाषेतून आला?
(1) इंग्रजी (2) पोर्तुगीज (3) अरबी (4) बंगाली

9. पुढील शब्दांपैकी व्याकरणदृष्ट्या बरोबर असलेला शब्द ओळखा.
(अ) आधारित (ब) आनुवंशिक (क) आनुषंगिक (ड) आनुकूल्य
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (अ) बरोबर
(2) फक्त (ब), (क), (ड) बरोबर
(3) फक्त (क) बरोबर
(4) (अ), (ब), (क), (ड) सर्व बरोबर

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

10. आवृत्तीवाचक संख्याविशेषणे असलेल्या उत्तराचा पर्याय ओळखा :
(1) चौदा भाषा, सहस्त्र किरणे, दहा मुली, साठ रुपये.
(2) चौपट मुले, दसपट रुपये, दुहेरी रंग, द्विगुणित आनंद.
(3) चौथा मुलगा, आठवी इयत्ता, साठावे वर्ष, पहिला वर्ग.
(4) थोडी मुले, काही पक्षी, इतर लोक, इत्यादी देश.

11. द्वंद्व समास नसलेले वाक्य ओळखा.
(1) मुलांनी आई-वडिलांची आज्ञा पाळावी.
(2) पावसाळ्यात भाजीपाला स्वस्त मिळतो.
(3) सुलभाची तब्येत दोन-तीन दिवसात बरी होईल.
(4) अभ्यास न केल्यामुळे कल्पना नापास झाली.

12. लेखननियमानुसार अयोग्य असलेले वाक्य ओळखून त्याचा अचूक पर्याय ओळखा.
(1) अक्षरे म्हणजे पूर्ण उच्चारलेले वर्ण होय.
(2) व्यंजनात स्वर मिळवून अक्षर बनते.
(3) अक्षर म्हणजे पूर्ण अर्थाचे बोलणे होय.
(4) मुखावाटे निघणाऱ्या मूलध्वनींना वर्ण म्हणतात.

13. 'मुख कमळासारखे सुंदर आहे' या वाक्यातील 'उपमान' कोणते ते ओळखा.
(1) मुख (2) कमळ (3) सुंदर (4) यापैकी एकही नाही

14. स्पष्ट अनुस्वार असलेले अक्षर __________ असते.
(1) गुरू (2) लघु (3) पद (4) चरण

15. 'प्रज्ञाच्या आठवणीने आईचे डोळे पाणावले' या वाक्यातील 'पाणावले' शब्दाचे क्रियापद ओळखा.
(1) साधित क्रियापद
(2) सिद्ध क्रियापद
(3) शक्य क्रियापद
(4) भावकर्तृक क्रियापद

16. 'वडिलार्जित' या शब्दाच्या विरुद्धार्थी असलेला शब्द ओळखा.
(1) सनातनी (2) उधळ्या (3) स्वकष्टार्जित (4) अवलक्षणी

17. योग्य पर्याय निवडा :
(अ) 'आम्ही जातो आमुच्या गावा' हे केवलवाक्य आहे.
(ब) 'जे चकाकते, ते सोने नसते' हे संयुक्तवाक्य आहे.
**पर्यायी उत्तरे :**
(1) (अ) चूक
(2) (ब) बरोबर
(3) (अ) आणि (ब) चूक
(4) (अ) बरोबर, (ब) चूक

18. 'एकत्रित कुटुंबात असलेल्या वर्षाला कामाचा सदान्‌कदा कंटाळा असतो', या वाक्यासाठी खालील लागू असलेल्या योग्य म्हणीचा पर्याय लिहा.
(1) कानात बुगडी, गावात फुगडी
(2) खायला काळ, भुईला भार
(3) का गं बाई उभी, दारात दोघी तिघी
(4) केळीवर नारळी अन् घर चंद्रमौळी

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

19. "ज्याची श्रध्दा नसते त्याच्यापासून परमेश्वर दूर असतो" या वाक्यासाठी खाली दिलेल्या योग्य त्या म्हणीचा पर्याय निवडा.

(1) पिंडी ते ब्रह्मांडी
(2) पदरी पडले पवित्र झाले
(3) पाप्याला पंढरपूर, आळशाला गंगा दूर
(4) पदरी पडले झोंड, हासून केले गोड

---

20. तत्पुरुष समासाचे वाक्य ओळखा.

(1) प्राची वर्गात कधीच गैरहजर राहत नाही.
(2) विजयाला पुरणपोळी फार आवडते.
(3) प्रियांका पंचवटीत राहाते.
(4) प्रभाचा चुलत सासरा वारला.

---

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित 21 ते 25 या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

शिवाजी महाराजांचे जीवितकार्य पायाखाली तुडविल्या गेलेल्या व आत्मविश्वास गमावून बसलेल्या, मृतप्राय समाजाला शुद्धीवर आणणे, वर मान करून आपल्या हीनदीनतेस कारणीभूत झालेल्या परकीय राज्यकर्त्यांविरुद्ध दंड थोपटून ताठ उभे राहण्यास त्यास तयार करणे, हे होते; व ते त्यांनी पन्नास वर्षांच्या थोड्या आयुष्यात सिद्ध करून दाखविले. यापुढे जाऊन त्यांना आधुनिक जगाची वाट चालावयास लावणे त्यांच्याकडून होऊ शकले नाही. कारण तसे करण्यास त्यांना वेळ व सामर्थ्य दोन्हीही नव्हती. पण जुनी कोंडी फोडून तीतून बाहेर पडण्याचे धाडस व कल्पना त्यांच्यात होती. त्यांचे मन नव्याचा स्वीकार करण्याइतके उदार होते. मात्र भोवतालच्या समाजाची प्रवृत्ती तिकडे अगदी नव्हती. ज्याप्रमाणे आमचे वैद्यक हजारो वर्षांचे जुने असताना नव्याने इकडे आलेल्या पाश्चात्य वैद्यकाची बरोबरी करू शकले नाही, तोच प्रकार इतर क्षेत्रांतही घडला. यावरून असे दिसते की, परिणामत: दुसऱ्याचे ज्ञान स्वीकारणे एवढाच मार्ग अशा परिस्थितीत मानवास मोकळा असतो. शिवाजी महाराजांना औरंगजेबाचे दीर्घायुष्य लाभते तर त्यांनी हाही मार्ग आक्रमिण्यास सुरुवात केली असती, असे त्यांच्या मन:प्रवृत्तीवरून ठरते.

भरतखंडात इतरांना न मिळालेला असा वारसा शिवाजी महाराजांमुळे मराठ्यांना मिळालेला आहे. आपल्या पूर्वजांनी अजून न विसरलेल्या काळात शेकडो लढाया मारलेल्या आहेत; मोठी सैन्ये घेऊन देशाच्या सीमेवर जाऊन आपले खंड परक्याच्या हल्ल्यांपासून राखण्याचा अटीतटीचा सामना ते खेळले आहेत; स्वतंत्र राज्ये त्यांनी चालविली आहेत; महसूल व खर्च यांच्या कोट्यवधी रकमांचा व्यवहार आपण हाताळला आहे; साम्राज्याचे प्रश्न सोडविण्याचा स्वत: प्रयत्न केला आहे; धर्मरक्षणासाठी त्यागही केले आहेत, असे या खंडातील दुसऱ्या कोणत्या लोकांना म्हणता येण्यासारखे आहे? यांच्या आठवणीवरच आजच्या मराठ्यांचे आयुष्य रचलेले आहे. यामुळे इतर लोकांत सहसा न आढळणारा बौद्धिक हव्यास, ध्येयवृत्ती, दीर्घोद्योग, हाल सोसण्याची तयारी, मनात आणलेली गोष्ट प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची धडपड, त्यागाचा सराव, निर्लोभता, शीलवत्ता व या सर्वांहून अधिक प्रमाणात एक प्रकारचा साधेपणा व समत्व, हे गुण अखिल मराठ्यांत कायम घर करून राहिले आहेत. ही काय थोडी वडिलोपार्जित दौलत आपल्या वाट्यास आली आहे? आणि अशा दौलतीचा आरंभ ज्या महापुरुषाने इतिहासात करून दिला त्यांचे उपकार व गुण आठविणे, हे आपले कर्तव्य नव्हे काय?

---

21. आत्मविश्वास गमावलेल्या समाज मनात आत्मभान जागृत करणे, अन्याय करणाऱ्या परकीय राज्यकर्त्यांविरुद्ध दंड थोपटून समाजाला ताठ मानेने उभे करणे हे शिवाजी महाराजांचे ________ होते.

(1) सामर्थ्य
(2) प्रवृत्ती
(3) जीवितकार्य
(4) ध्येय

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

22. शिवरायांचे कोणते गुण मराठ्यांमध्ये कायम घर करून राहिले आहेत ?

(1) अन्यायी राज्यकर्त्यांविरुद्ध दंड थोपटणे (2) वेळ व सामर्थ्य खर्ची करणे

(3) मान वर करून बोलणे (4) साधेपणा व समत्व

---

23. महापुरुषांसंदर्भात आपले कोणते कर्तव्य असायला हवे ? लेखकाचे मत मांडा.

(1) त्यांचे पुतळे उभारणे (2) त्यांचे उपकार व गुण आठवणे

(3) त्यांचे रोज भजन-कीर्तन करणे (4) त्यांना देवत्व प्राप्त करून देणे

---

24. शिवाजी महाराजांचे मन कोणत्या कारणासाठी उदार होते ?

(1) मोठे सैन्यदल उभारण्यासाठी (2) कोट्यवधींचा महसूल गोळा करण्यासाठी

(3) नव्या विचारांचा स्वीकार करण्यासाठी (4) दीर्घायुष्य लाभण्यासाठी

---

25. छ. शिवाजी महाराजांना आपले जीवितकार्य सिद्ध करून दाखविण्यासाठी किती काळ लाभला ?

(1) 30 वर्षे (2) 50 वर्षे (3) दीर्घायुष्य (4) 52 वर्षे

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

26. I wish that he <u>were</u> generous.

Identify the mood of the expression underlined.

(1) Imperative (2) Indicative

(3) Subjunctive (4) None of the above

---

27. No other man was so strong as Hercules. Which one of the following changes the above sentence into superlative degree ?

(1) Hercules was the strongest man.

(2) Hercules was the strongest of all men.

(3) Hercules was the most strong of all man.

(4) Hercules was the strongest of men.

---

28. 'The police caught the gang of robbers'.

State which type of noun is the word 'gang'.

(1) common noun (2) abstract noun

(3) collective noun (4) proper noun

---

29. 'I can hear him singing a song'.

Identify the word 'singing'. Say whether it is :

(1) Gerund (2) Adverb

(3) Present Participle (4) Participial Adjective

---

30. He <u>got through</u> his examination.

The underlined idiom in the above sentence means ________.

(1) overcame (2) obtained (3) failed (4) passed

---

31. Which of the following is **not** the exact synonym of the following word ?

inhuman

(1) barbaric (2) bestial (3) merciless (4) loving

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

32. *My mother would lift me up.*

Select the **correct** tag question to the sentence.

(1) Wouldn't She ? (2) Wouldn't I ? (3) Would She ? (4) Would I ?

---

33. I told him <u>that he had failed</u>.

The underlined clause in the above sentence is an example of ________.

(1) adjective clause (2) noun clause

(3) adverb clause (4) verb clause

---

34. *He was so fond of amusement that he could not become a prosperous man.*

Identify the type of clause in the above sentence.

(1) Adjective clause (2) Adverb clause of purpose

(3) Adverb clause of effect (4) Noun clause

---

35. Travel <u>light</u> if you must.

Identify the part of speech of the word underlined.

(1) Noun (2) Verb (3) Adjective (4) Adverb

---

36. Give exact meaning of the following phrase :

Bank on

(1) to go to bank (2) to close bank

(3) on the bank of river (4) to rely with confidence

---

37. Fill in the blank with the appropriate verb :

Neither of the four teachers ________ willing to teach Physics.

(1) are (2) were (3) had (4) is

---

38. *Although he is a hard master, his intentions are good.*

Identify the type of sentence.

(1) Complex (2) Compound

(3) Simple (4) Complex-compound

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

39. *Eagle flies higher than any other bird.*

Identify the **correct** positive degree of the above sentence.

(1) Eagle flies highest of all the birds.

(2) No other bird flies as high as eagle.

(3) Very few birds fly as high as eagle.

(4) No birds flies higher than eagle.

---

40. What will be the past participle of "Shrink" ? Choose **correctly**.

(1) Shrunk (2) Skunk (3) Shrank (4) Shrng

---

41. 'The flower loses freshness and scent when plucked.'

State which type of noun is the word 'freshness'.

(1) common noun (2) abstract noun

(3) collective noun (4) proper noun

---

42. 'I have often seen falling stars'.

Identify the word 'falling'.

Choose the option.

(1) Present Participle (2) Past Participle

(3) Participial Adjective (4) None

---

43. Recognise which kind of adverb is used in the sentence ?

'He writes quite beautifully'.

Choose **correctly**.

(1) adverb of place (2) adverb of manner

(3) adverb of degree (4) adverb of time

---

44. Pick out the **correct** sentence from the following :

(1) Either the action was just or unjust.

(2) The action either was just or unjust.

(3) The action was either just or unjust.

(4) Either was the action just or unjust.

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**45.** The road winds up the mountain.

Pick out the **correct** meaning of the underlined phrase.

(1) twists and turns
(2) roll
(3) breezes
(4) comes to an end

---

**Read the following passage carefully and answer the questions from 46 - 50 given below :**

Education is not an end but a means to an end. In other words, we do not educate our children only for the purpose of educating them: our purpose is to fit them for life. As soon as we realize this fact, we will understand that it is very important to choose a system of education which will really prepare children for life. It is not enough just to choose the first system of education one finds or to continue with one's old system of education without examining it to see whether it is in fact suitable or not.

In many modern countries it has for sometime been fashionable to think that by free education for all–whether rich or poor, clever or stupid-one can solve all the problems of society and build a perfect nation. But we can already see that free education for all is not enough: we find in such countries a far larger number of people with university degrees, they refuse to do what they think 'low work' and in fact, work with the hands is thought to be dirty and shameful in such countries.

But we have only to think a moment to understand that the work of a completely uneducated farmer is far more important than that of the professor: we can live without education but we die if we have no food. If no one cleaned our streets and took the rubbish away from our houses, we should get terrible diseases in our towns. In countries where there are no servants because everyone is ashamed to do such work, the professors have to waste much of their time doing housework.

In fact, when we say that all of us must be educated, we mean that all of us must be educated in such a way that, first, each of us can do whatever job is suited to his brain and ability and secondly, that we can realize that all jobs are necessary to society and that it is very bad to be ashamed of one's work or to scorn someone else's. Only such a type of education can be called valuable to society.

---

**46.** The professors in some countries do household work because ________.

(1) the work of professors is more important than the work of an uneducated farmer.
(2) the professors die if they have no food.
(3) the professors want to waste much of their time.
(4) everyone in such countries is ashamed of doing household work.

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**47.** A large number of people with university degrees refuse to do ________ work.

Which one of the following **correctly** fills the blank in the above sentence ?

(1) dirty (2) shameful (3) less important (4) manual

---

**48.** The logical implication of the above passage is that ________.

(1) we must get free education.

(2) servants and professors should be equal.

(3) we must examine whether the system of education we choose is suitable.

(4) we need education for getting our food.

---

**49.** The word "end" in the above passage means ________.

(1) objective (2) last (3) final (4) means

---

**50.** Which one of the following is meant by saying ?

"All of us must be educated" ?

(1) we must realize that we should do jobs which suit our brain and ability.

(2) all of us must do housework like professors.

(3) we must not run after university degrees.

(4) we should be able to solve all the problems of society.

---

**51.** प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या धर्तीवर राज्यात दि. 28 ऑक्टोबर 2015 पासून सुरू करण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री ग्राम सडक योजना' अंतर्गत रस्ते जोडणीकरिता खालील निकष बरोबर आहे :

(1) आदिवासी क्षेत्रात 300 पेक्षा जास्त व सर्वसाधारण क्षेत्रात 500 पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या वाड्या-वस्त्या जोडणे.

(2) आदिवासी क्षेत्रात 250 पेक्षा जास्त व सर्वसाधारण क्षेत्रात 500 पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या वाड्या-वस्त्या जोडणे.

(3) आदिवासी क्षेत्रात 150 पेक्षा जास्त व सर्वसाधारण क्षेत्रात 250 पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या वाड्या-वस्त्या जोडणे.

(4) आदिवासी क्षेत्रात 350 पेक्षा जास्त व सर्वसाधारण क्षेत्रात 550 पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या वाड्या-वस्त्या जोडणे.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

52. खारभूमी विकास योजनेच्या उद्दिष्टामध्ये कशाचा समावेश आहे ?

(1) समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून शेतजमिनीचे संरक्षण करणे.

(2) शेतजमिनीत क्षारांच्या प्रवेशास अटकाव करणे.

(3) चक्रीवादळ, त्सुनामी वेळेस पिकाखालील क्षेत्र व मालमत्ताचे संरक्षण करणे.

(4) वरील सर्व

---

53. भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळवण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 हा केव्हापासून राज्यात अंमलात आला आहे ?

(1) दि. 1 जानेवारी 2014 (2) दि. 02 ऑक्टोबर 2013

(3) दि. 26 जानेवारी 2014 (4) दि. 1 एप्रिल 2014

---

54. मंत्रालयातील महिला कर्मचारी तसेच मंत्रालयात येणाऱ्या स्तनदा मातांना आपल्या बाळांना स्तनपान करणे सुलभ व्हावे यासाठी मंत्रालयात स्थापन करण्यात आलेल्या कक्षाचे नाव काय आहे ?

(1) भाग्यश्री कक्ष (2) मातोश्री कक्ष (3) हिरकणी कक्ष (4) बालक कक्ष

---

55. खालीलपैकी कोणत्या राज्य पुरस्कृत योजना आहेत ?

(1) संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना.

(2) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व आम आदमी विमा योजना.

(3) राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना.

(4) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना.

---

56. डॉ. झाकिर हुसैन मदरसा आधुनिकीकरण योजना ही __________ पुरस्कृत योजना आहे.

(1) केंद्र शासन (2) केंद्र शासन व राज्य शासन

(3) युनिसेफ व जागतिक बँक (4) राज्य शासन

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

57. 'सेंद्रिय शेती/विषमुक्त शेती' या योजनेच्या अंमलबजावणीतील पहिल्या टप्प्यांमध्ये खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे?

(1) नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, वर्धा

(2) ठाणे, पालघर, रत्नागिरी, गडचिरोली, नंदुरबार

(3) अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ, वर्धा

(4) सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, नाशिक

---

58. 'उन्नत शेती-समृद्ध शेतकरी' या मोहिमे संदर्भात (उद्दिष्टे) खालीलपैकी कोणती विधान/विधाने **बरोबर** आहेत?

(अ) प्रमुख पिकांची उत्पादकता व उत्पादन क्षमतेतील तफावत दूर करणे.

(ब) पीक विमा योजनेअंतर्गत जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सहभागी करून घेणे.

(क) शेतमालांना उत्पादन खर्चावर आधारित किंमत मिळवून देणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व (2) एकही नाही (3) (अ) व (ब) (4) (ब) व (क)

---

59. दर्जेदार मराठी चित्रपट निर्मिती अर्थसहाय्य योजनेअंतर्गत 'अ' दर्जा प्राप्त चित्रपटांना किती मर्यादेपर्यंत अनुदान दिले जाते?

(1) ₹ 40.00 लक्ष (2) ₹ 35.00 लक्ष (3) ₹ 30.00 लक्ष (4) ₹ 25.00 लक्ष

---

60. पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाच्या शिवारातच अडविणे, भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे, राज्याच्या सिंचन क्षेत्रात वाढ करणे, पाणी साठवण क्षमता पुन:स्थापित करणे, निकामी जलस्त्रोतांमधील गाळ काढणे, पाणी अडविणे पाणी जिरविणे बाबत लोकांना प्रोत्साहित करणे या करीता राज्यात जलयुक्त शिवार योजना राबविण्याचा निर्णय शासनाने कधी घेतला?

(1) नोव्हेंबर 2014 (2) डिसेंबर 2014 (3) जानेवारी 2015 (4) ऑक्टोबर 2014

---

61. समुद्रतळाखालून केबल टाकून अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने बेटावर वीज पोहचविण्याची घटना देशात प्रथमच घडली या घटनेद्वारे कोणत्या बेटावर वीज पोहचविण्यात आली?

(1) राजापूरी (2) भाट्ये (3) घारापुरी (4) मार्वे

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

62. देशातील 100 स्मार्ट सिटीमध्ये राज्यातील एकूण किती शहराचा समावेश करण्यात आला आहे?

(1) 8 (2) 9 (3) 10 (4) 11

---

63. शुभमंगल सामूहिक विवाह योजनेबाबत खालील विधान/विधाने **बरोबर** आहेत :

(अ) सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये किमान 5 व कमाल 100 जोडपी आवश्यक

(ब) शेतकऱ्यांच्या/शेतमजुरांच्या मुलीच्या विवाहासाठी प्रति जोडपे ₹ 25,000 इतके अनुदान

(क) सामूहिक विवाह राबविणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस प्रति जोडपे ₹ 2000 इतके प्रोत्साहनात्मक अनुदान

(ड) योजनेची अंमलबजावणी जिल्हा नियोजन विकास समितीद्वारे करण्यात येते

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (क) व (ड) बरोबर (2) (ब), (क) व (ड) बरोबर

(3) (अ), (ब), (क) व (ड) बरोबर (4) (अ), (ब) व (क) बरोबर

---

64. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्ती/गावांचा विकास करण्यासंदर्भात सन 2018-19 या वर्षापासून कोणती राज्यस्तरीय योजना सुरू करण्यात आली आहे?

(1) अटल बिहारी ग्रामीण विकास योजना

(2) अे.पी.जे. अब्दुल कलाम दलित वस्ती योजना

(3) भारत रत्न बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना

(4) छत्रपती शाहू महाराज ग्रामीण सुधार कार्यक्रम

---

65. 'मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना' या योजनेच्या उद्दिष्टांमध्ये खालीलपैकी कोणत्या उद्दिष्टाचा समावेश आहे?

(1) अन्न प्रक्रिया उद्योगाला चालना देणे

(2) शेतीमालाचे मूल्यवर्धन करणे

(3) ऊर्जेची बचत करण्यासाठी प्रकल्पांचे आधुनिकीकरणास प्रोत्साहन

(4) वरील सर्व

---

66. खाजगी विना अंनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थामधील व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता राजर्षी छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्ती योजना राज्यात कधीपासून लागू करण्यात आली?

(1) मार्च 2016 (2) जून 2006 (3) एप्रिल 2017 (4) ऑक्टोबर 2015

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

67. आदिवासी आश्रमशाळातील विद्यार्थ्यांना साहसी क्रिडा प्रकारात त्यांच्यामधील आत्मविश्वास वृद्धीगत करण्यासाठी आदिवासी विकास विभागाने माऊंट एव्हरेस्ट शिखर सर करण्याबाबत या वर्षी अंमलात आणलेल्या योजनेचे नाव काय आहे?

(1) मिशन धैर्य – 2 (2) मिशन शौर्य – 2 (3) मिशन हिम्मत – 2 (4) मिशन साहस – 2

68. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील दारिद्र्यरेषेखालील भूमिहिन कुटुंबांना जमिन उपलब्ध करून देण्यासंदर्भातील 'कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना' राज्यामध्ये कधीपासून अंमलात आली?

(1) सन 2004 - 05 (2) सन 2014 - 15 (3) सन 2017 - 18 (4) सन 2018 - 19

69. मा. पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखालील निती आयोगाची स्थापना कधी/केव्हापासून झाली?

(1) 1 जानेवारी 2015 (2) 1 एप्रिल 2015

(3) 15 ऑगस्ट 2015 (4) 26 जानेवारी 2016

70. 'मनोधैर्य योजना' संदर्भात खालील कोणते विधान **चुकीचे** आहे?

(1) बलात्कार, बालकावरील लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसहाय्य व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी मदत.

(2) सदर योजना केवळ अनुसूचित जमाती मधील महिला व बालकांसाठी आहे.

(3) अत्याचार ग्रस्तांना/वारसदारांना निवारा, समुपदेशन, वैद्यकीय मदत, कायदेशीर सहाय्य दिले जाते.

(4) पीडित महिलांना तातडीने मानसिक आधार मिळण्यासाठी जिल्हास्तरावर District Trauma Team गठीत करण्यात आली आहे.

71. मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 च्या कोणत्या कलमानुसार "राज्य मानवी हक्क आयोग" स्थापन करण्यात येतो?

(1) कलम 14 (2) कलम 21 (3) कलम 16 (4) कलम 19

72. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान राज्यात केव्हापासून सुरू झाली?

(1) फेब्रुवारी 2010 (2) ऑगस्ट 2014 (3) मे 2015 (4) जानेवारी 2016

73. महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्षित वितरण) अधिनियम, 2016 हा राज्यात केव्हापासून अंमलात आला?

(1) दि. 26 जानेवारी 2016 (2) दि. 1 मे 2016

(3) दि. 15 ऑगस्ट 2016 (4) दि. 26 जानेवारी 2017

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

74. कोणत्या दिवशी ग्रामीण महाराष्ट्र हागणदारीमुक्त घोषित करण्यात आला ?

(1) 2 ऑक्टोबर 2018 (2) 1 एप्रिल 2018 (3) 1 मे 2018 (4) 18 एप्रिल 2018

75. 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना 2015 - 16' संदर्भात खालीलपैकी कोणते विधान/विधाने **चुकीची** आहेत ?

(अ) खातेदाराचा अपघाती मृत्यू झाल्यास रु. दोन लाख नुकसान भरपाई मिळेल.

(ब) योजना कालावधीत संपूर्ण दिवसासाठी ही योजना लागू आहे.

(क) या योजनेपूर्वी शेतकऱ्यांनी अन्य विमा संस्थेकडे विमा उतरविला असल्यास त्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही.

(ड) लाभार्थींचा वयोगट वय 10 ते 75 वर्षे हा आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (अ), (ब) व (क) (2) केवळ (ब) व (क)

(3) केवळ (क) (4) केवळ (क) व (ड)

76. योग्य व्यक्ती ओळखा :

(अ) त्यांनी 1921 मध्ये वकिलीवर पाणी सोडले.

(ब) 'द मदरलँड' नावाचे इंग्रजी साप्ताहिक त्यांनी सुरू केले.

(क) ते तीन वेळा शाही विधानमंडळावर (इंपीरिअल लेजिस्लेचर) निवडून गेले होते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) मोतीलाल नेहरू (2) हकीम अजमल खान (3) लाला लजपत राय (4) मझार उल हक

77. 1938 मध्ये केरळात कुळ कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी या संघटनेने आंदोलन करून मागण्या मांडल्या :

(1) अखिल भारतीय किसान सभा (2) अखिल मलबार कर्षक संघम्

(3) शेतकरी सभा (4) पट्टेदार सभा

78. 1926-27 मध्ये अमरावतीच्या अंबादेवी मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा यासाठीच्या चळवळीचे यशस्वी नेते कोण होते ?

(1) विसोजी डोणे (2) विश्राम रामजी घोले (3) पंजाबराव देशमुख (4) बापूजी अणे

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

79. योग्य जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | श्री शिवाजी वैदिक विद्यालय | (i) | परशुराम घोसरवाडकर |
| (ब) | दुधगाव विद्यार्थी आश्रम | (ii) | शाहू महाराज |
| (क) | श्रद्धानंद वसतिगृह | (iii) | भाऊराव पाटील |
| (ड) | सत्यशोधक समाज, कोल्हापूर शाखा | (iv) | पंजाबराव देशमुख |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iv) | (ii) | (iii) |
| (2) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (3) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

---

80. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारती समोरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे भव्य शिल्प कोणी साकारले आहे?

(1) श.बा. कापुसकर (2) वि.पां. करमरकर (3) बी.आर. खेडकर (4) म.ग. गर्गे

---

81. **स्तंभ 'अ'** आणि **स्तंभ 'ब'** यांच्या योग्य जोड्या जुळवा :

| | **स्तंभ - 'अ'** (लघुउद्योग) | | **स्तंभ - 'ब'** (स्थान/ठिकाण) |
|---|---|---|---|
| (अ) | चादरी | (i) | सावंतवाडी |
| (ब) | पैठणी | (ii) | औरंगाबाद |
| (क) | हिमरुशाली | (iii) | येवला |
| (ड) | लाकडी खेळणी | (iv) | सोलापूर |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

82. महाराष्ट्रातील पश्चिम किनारपट्टीच्या स्थानानुसार दक्षिणेकडून उत्तरेकडे जाताना खाड्यांचा योग्य क्रम असलेला पर्याय निवडा.

(1) धरमतर - दाभोळ - विजयदुर्ग - तेरेखोल

(2) विजयदुर्ग - तेरेखोल - धरमतर - दाभोळ

(3) तेरेखोल - विजयदुर्ग - दाभोळ - धरमतर

(4) दाभोळ - तेरेखोल - धरमतर - विजयदुर्ग

---

83. 2011 च्या जनगणनेनुसार खालीलपैकी कोणत्या राज्यात लिंग-गुणोत्तराचे प्रमाण सर्वाधिक आहे?

(1) आंध्र प्रदेश (2) केरळ (3) महाराष्ट्र (4) उत्तर प्रदेश

---

84. खालील विधानांची सत्यता तपासा आणि योग्य पर्याय निवडा.

(अ) देशातील प्रमुख शहरे लोहमार्गाद्वारे मुंबईला जोडलेली आहेत.

(ब) मुंबई हे मध्य व पश्चिम रेल्वे विभागाचे मुख्य कार्यालय आहे.

(क) राज्यातील भूमी स्वरूपांमुळे लोहमार्गांचे वितरण असमान झाले आहे.

(ड) राज्यातील बहुतांश रेल्वेमार्ग नद्यांच्या खोऱ्यातून गेले आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) आणि (ब) बरोबर आहेत.

(2) (क) आणि (ड) बरोबर आहेत.

(3) (अ), (ब) आणि (क) बरोबर आहेत.

(4) (अ), (ब), (क) आणि (ड) बरोबर आहेत.

---

85. खालील वैशिष्ट्ये कोणत्या वसाहती प्रारूपाची आहेत?

(अ) रस्त्याला अनुसरून घरे बांधलेली असतात.

(ब) वसाहतीच्या बाहेरील बाजूला घरांच्या रांगा परस्परांना समांतर असतात.

(क) वसाहतीच्या केंद्रभागी दुकाने, उपाहारगृहे यासारखी व्यापारी केंद्रे असतात.

(ड) वसाहतीमधील रस्ते एकमेकांना समांतर असतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) रेषाकृती वसाहत प्रारूप (2) चौकोनाकृती वसाहत प्रारूप

(3) तारकृती/तारासदृश्य वसाहत प्रारूप (4) वर्तुळाकार वसाहत प्रारूप

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

86. भारताच्या कोणत्या राष्ट्रपतींनी पूर्वी उपराष्ट्रपती पद सुध्दा भूषविले होते ?

(अ) डॉ. झाकीर हुसैन
(ब) डॉ. शंकर दयाल शर्मा
(क) वराहगिरी व्यंकट गिरी
(ड) नीलम संजीव रेड्डी

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब), (ड) (2) (ब), (क), (ड) (3) (अ), (क), (ड) (4) (अ), (ब), (क)

---

87. खालील विधाने विचारात घ्या :

(अ) भारतीय राज्यघटनेच्या 324 व्या कलमामध्ये निर्वाचन आयोगाची तरतूद करण्यात आली आहे.
(ब) भारतीय निर्वाचन आयोगातील मुख्य निर्वाचन आयुक्तांची नेमणूक राष्ट्रपती करतात.
(क) भारतीय निर्वाचन आयोगाला ग्रामपंचायतीच्या निवडणूका घेण्याचा अधिकार आहे.
(ड) मतदार याद्या तयार करण्याचे कार्य निर्वाचन आयोगाला करावे लागते.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (अ), (ब) आणि (क)
(2) (अ), (ब) आणि (ड)
(3) (अ), (क) आणि (ड)
(4) (ब), (क) आणि (ड)

---

88. पी.व्ही. राजगोपाल, गांधीवादी कार्यकर्ते यांनी __________ ही संस्था स्थापन केली आहे.

(1) गांधी सेवा परिषद (2) जनसत्ता (3) जनादेश (4) जन सत्याग्रह

---

89. खालील विधाने विचारात घ्या :

(अ) महाराष्ट्राच्या विधान परिषदेची सदस्य संख्या 78 आहे.
(ब) महाराष्ट्राच्या विधान परिषदेत 1/6 सदस्य राज्यपालांकडून नामनिर्देशित केले जातात.
(क) महाराष्ट्राचे राज्यपाल विधान परिषदेचे पदसिद्ध सदस्य असतात.
(ड) महाराष्ट्राच्या विधान परिषदेचा कार्यकाल सहा वर्षे आहे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (अ), (ब) आणि (क)
(2) (अ) आणि (ब)
(3) (ब), (क) आणि (ड)
(4) (अ), (ब) आणि (ड)

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**90.** योग्य कथने ओळखा :

(अ) राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्राम पंचायती, नगरपालिका व महानगरपालिका यांचे निवडणूक विषयक कामकाज हाताळण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली.

(ब) राज्य निवडणूक आयुक्त हे पद ऑगस्ट, 1994 मध्ये निर्माण करण्यात आले.

(क) महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही भारतीय संविधानानुसार निर्माण केलेली संस्था आहे व तिची कार्ये संविधानाच्या 320 व्या अनुच्छेदात निर्दिष्ट आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) (2) (ब), (क) (3) (अ), (क) (4) वरील सर्व

---

**91.** अयोग्य कथन/कथने कोणती आहेत?

(अ) लुका मॉड्रिचला 2018 चा बलॉन डी' ऑर पुरस्कार प्राप्त झाला.

(ब) लिओनेल मेस्सी याला 2017 चा बलॉन डी' ऑर पुरस्कार मिळाला होता.

(क) लुका मॉड्रिच हा पोर्तुगाल देशाचा खेळाडू आहे.

(ड) कायलन मबापेला 2018 चा 21 वर्षा खालील बलॉन डी' ऑर पुरस्कार प्राप्त झाला.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) (2) (ब), (क) (3) (क), (ड) (4) (अ), (ड)

---

**92.** जलयुक्त शिवार अभियानाबाबत योग्य कथने कोणती आहेत?

(अ) जलयुक्त शिवार अभियानासाठी मागील तीन वर्षात निवडण्यात आलेल्या एकूण 16 हजार 519 गावांपैकी 15 हजार 859 गांवे दुष्काळ मुक्त झाली आहेत.

(ब) जल युक्त शिवार अभियानमुळे पीक उत्पादकतेत 30 ते 50 टक्क्यांनी वाढ झाली आहे.

(क) मृद् व जलसंधारणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नागपूर येथे मृद् व जलसंधारण आयुक्तालयाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) (2) (ब), (क) (3) (अ), (क) (4) वरीलपैकी सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

93. खालील विधाने विचारात घ्या :

(अ) ब्रिटनमध्ये महानगरपालिकेच्या प्रमुखाला 'मेयर' या नावाने संबोधले जाते. भारतात देखील महानगरपालिकेच्या प्रमुखाला 'मेयर' या नावाने संबोधले जाऊ लागले.

(ब) 'मेयर' या शब्दासाठी पर्यायी शब्द 'महापौर' पहिल्यांदा लोकमान्य टिळक यांनी उच्चारला, तेव्हापासून यास मराठीत 'महापौर' या नावाने संबोधले जाते.

(क) महापौराचा कार्यकाल अडीच वर्षांचा $\left(2\frac{1}{2}\right)$ आहे. महापौर आपला राजीनामा कार्यकाल संपण्यापूर्वीही स्वखुशीने विभागीय आयुक्ताकडे देतो.

वरीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (अ) (2) (ब) आणि (क) (3) (अ) आणि (क) (4) वरील सर्व

---

94. जोड्या लावा – (द मॅन बुकर पुरस्कार, 2018)

| **'अ' (लेखक / साहित्यकार)** | **'ब' (ग्रंथ / साहित्यकृती)** |
|---|---|
| (अ) ॲना बर्नस | (i) द मार्स रूम |
| (ब) डेझी जॉन्सन | (ii) मिल्कमॅन |
| (क) रॅशेल कुचनेर | (iii) द लाँग टेक |
| (ड) रॉबिन रॉबर्टसन | (iv) एव्हरीथिंग अंडर |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(अ)** | **(ब)** | **(क)** | **(ड)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (ii) | (iv) | (i) | (iii) |

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**95.** योग्य कथने कोणती आहेत ?

(अ) 2015-2016 चा 'ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार' संशोधक-समिक्षक डॉ. उषा जाधव-देशमुख यांना घोषित करण्यात आला.

(ब) सप्टेंबर, 2016 मध्ये पुणे शहरास 'स्वच्छ शहर' तर सिंधुदुर्ग जिल्ह्यास 'स्वच्छ जिल्हा' या राष्ट्रीय स्वच्छता पुरस्काराने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हस्ते गौरविण्यात आले.

(क) 2018 हे वर्ष 'व्हिजिट महाराष्ट्र वर्ष' राज्य सरकारने जाहिर केल्यानंतर महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाने 'टुरिझम मोबाईल ॲप' उपलब्ध केले.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) (2) (ब), (क) (3) (अ), (क) (4) वरील सर्व

---

**96.** माहितीचा अधिकार कायदा, 2005 च्या अंतर्गत पुढील विधानांचा विचार करा.

(अ) या कायद्या अंतर्गत माहिती मिळविण्याचा अधिकार सर्व भारतीय नागरिकांना आहे.

(ब) कोणताही अपवाद न करता मागितलेली प्रत्येक माहिती देणे या कायद्याखाली बंधनकारक आहे.

**योग्य** उत्तर निवडा :

(1) (अ) बरोबर असून (ब) चूक आहे. (2) (अ) चूक असून (ब) बरोबर आहे.

(3) (अ) आणि (ब) दोन्ही बरोबर आहेत. (4) (अ) आणि (ब) दोन्ही चूक आहेत.

---

**97.** माहिती अधिकार कायदा, 2005 च्या तरतुदीनुसार प्रत्येक माहिती आयुक्तांचा पदावधी किती निश्चित केला आहे ?

(1) ज्या दिनांकास आपले पद धारण करील त्या दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधिपर्यंत

(2) त्याच्या वयाची पासष्ठ वर्षे पूर्ण होईपर्यंत

(3) ज्या दिनांकास आपले पद धारण करील त्या दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधीपर्यंत किंवा त्याच्या वयाची पासष्ठ वर्षे पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत

(4) वरीलपैकी काहीही नाही

---

**98.** माहिती अधिकाराचा कायदा, 2005 च्या संदर्भात पुढील विधानांचा विचार करा.

(अ) मागितलेली माहिती अर्ज केलेल्या दिनांकापासून वीस वर्षापूर्वी घडलेल्या घटनेची असेल तर ती देता येणार नाही.

(ब) माहिती मागण्याच्या अधिकारात एखाद्या वस्तुचा प्रमाणित नमुना मागणे किंवा घेणे समाविष्ट होत नाही.

आता **योग्य** उत्तर निवडा :

(1) (अ) बरोबर (ब) चूक (2) (अ) चूक (ब) बरोबर

(3) (अ) आणि (ब) दोन्ही चूक (4) (अ) आणि (ब) दोन्ही बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**99.** केंद्रीय माहिती आयुक्तांची नियुक्ती ________ हे करतात.

(1) माहिती निबंधक (2) पंतप्रधान (3) राष्ट्रपती (4) राज्यपाल

---

**100.** माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार जोड्या लावा :

| | **कलम** | | **तरतुदीं** |
|---|---|---|---|
| (अ) | 18 | (i) | माहिती आयोगाची कामे व अधिकार |
| (ब) | 20 | (ii) | सक्षम प्राधिकरणाने नियम करण्याचा अधिकार |
| (क) | 24 | (iii) | शास्ती |
| (ड) | 28 | (iv) | विवक्षित संघटनांना हा अधिनियम लागू नसणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (3) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| (4) | (ii) | (iv) | (i) | (iii) |

---

-o0o-

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र. क्र. 201.** "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial